**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २४ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या भत्त्यांमधे वाढ करण्याचा राज्य शासनाचा निर्णय.**
2. **अंदाज समित्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिषदेचा समारोप.**
3. **महानिर्मिती राज्यात उभारणार १०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प, तीन लाख शेतकऱ्यांना होणार लाभ.**

**आणि**

4. **नागपूरसह विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात ३० जून पर्यंत दररोज वादळी पर्जन्यमानासह पावसाचा इशारा.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मंत्रिमंडळ निर्णय

राज्य सरकारनं आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता तसंच आहार भत्त्यात वाढ करायचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. राज्यातल्या १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील पवनार पासून ते सिंधुदुर्ग जिल्ह्यापर्यंत जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गालाही आजच्या बैठकीत मान्यता दिली गेली. हा प्रकल्प महामंडळामार्फत राबवला जाणार असून, प्रकल्प आखणी आणि भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीला या बैठकीत मान्यता मिळाली. २०१७ च्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमात सुधारणा करून, आगामी अधिवेशनात नवं विधेयक आणण्याचा निर्णय देखील आजच्या बैठकीत झाला.

संविधान हत्या दिवस

संविधान हत्या दिवस उद्या पाळण्यात येणार आहे. २५ जून १९७५ या दिवशी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. या १८ महिन्यांच्या काळात मानवाधिकारांसाठीच्या लढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या

सर्वांना त्यानिमित्त आदरांजली वाहण्यात येईल. या निमित्तानं प्रत्येक भारतीयाच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाहीची ज्योत तेवत राहावी, तसंच हुकुमशाही प्रवृत्तींशी लढा देण्याची प्रेरणा मिळत राहावी याकरता हा दिवस गेल्या वर्षीपासून पाळला जातो. देशात आपत्काल लावण्यात आला तेव्हा केवळ बंदी बनविलेल्या लोकांमध्येच नव्हे तर जन सामन्यात आक्रोशाची भावना होती असं पंतप्रधान म्हणले.....

***मेरे प्यारे देशवासियो, जब देश में आपातकाल लगाया गया तब उसका विरोध सिर्फ़ राजनीतिक दायरे तक सीमित नहीं रहा था, राजनेताओं तक सीमित नहीं रहा था। जेल के सलाखों तक आंदोलन सिमट नहीं गया था। जन जन के दिल में एक आक्रोश था। खोए हुए लोकतंत्र की तड़प सी आपातकाल में देश के हर नागरिक को लगने लगा था तो उसका कुछ छीन लिया गया है, जिसका उसने जीवन में कभी उपयोग नहीं किया था। वो भी अगर छिन गया है तो उसका एक दर्द उसके दिल में था।***

संवाद शतकपूर्ती

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, देशाचे दोन महान आध्यात्मिक आणि नैतिक गुरु, श्री नारायण गुरु आणि महात्मा गांधी यांच्यात झालेल्या ऐतिहासिक संवादाच्या शतकपूर्ती सोहळ्याला आज संबोधित केलं. दोन महान नेत्यांमधील हा संवाद १२ मार्च १९२५ ला शिवगिरी मठात झाला होता. हा संवाद धर्मांतर, हिंसा, अस्पृष्यता निर्मूलन, मोक्षप्राप्ती आणि दलितांचा उद्धार अशा विषयांवर केंद्रित होता. श्री नारायण गुरुंनी महिला सक्षमीकरणाला चालना दिली. हेच धोरण राबवत सरकारनं महिला सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं, ते म्हणाले.

***श्री नारायण गुरु ने विरोध की परवाह नहीं की, वो कठिनाइयों से नहीं ￼रे क्योंकि उनका विश्वास, समरसता और समानता में था। उनका विश्वास सत्य सेवा और सौहार्द में था। यही प्रेरणा हमें सबका साथ सबका विकास का रास्ता दिखाती है। यही विश्वास हमें उस भारत के निर्माण के लिए ताकत देता है जहाँ अंतिम पायदान पर खड़ा व्यक्ति हमारी पहली प्राथमिकता है।***

अंदाज समिती

केंद्र आणि राज्य सरकारकडून कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च वाढत असल्याने संसद आणि विधिमंडळाच्या अंदाज समित्यांची जबाबदारी वाढली असून या समित्यांनी अधिक कार्यक्षमतेने जबाबदारीचं पालन करावं असं आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात केलं. अंदाज समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. देशावरील कर्जाचा भार पाहता जन कल्याणासाठी अधिक खबरदारीने खर्च करण्याची गरज आहे. त्यात या समित्यांची भूमिका महत्वाची असल्याचे ते म्हणाले. संसदीय समित्या सरकारच्या विरोधी नव्हे तर पूरक काम करतात. त्यांच्या अहवालाकडे पाहताना सरकारने हाच दृष्टिकोन ठेवावा आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या समित्यांचे अहवाल योग्य रितीने अंमलात आणावे अशी सूचना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी केली.

***संसदीय समितियां सरकार के विरोध में काम नहीं करती। सरकार के पूरक सरकार के मार्गदर्शन और सरकार को सलाह देने का काम करती है और मेरा मानना है सरकार को भी उसी सकारात्मक रूप से इन संसदीय समितियों की रिपोर्ट को लेना चाहिए।***

संसदीय समित्यांनी योग्य रीतीने समीक्षा केली तर अनेक बदल घडू शकतील. आतापर्यंत अनेक बदल झाले असले तरी बदलांना खूप वाव आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आणि तंत्रज्ञान तसंच डाटा अनॅलिसिस चा वापर करून अधिक चांगलं काम करता येईल, असही ओम बिर्ला म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्रात मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात मतदार यादीत केवळ पाच महिन्यात आठ टक्क्यांनी वाढ झाली तर काही मतदारसंघात वीस ते पन्नास टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. यासाठी मशीन रिडेबल डिजिटल मतदार यादी आणि सीसीटीव्ही फुटेज त्वरित प्रसिद्ध करण्याची मागणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली आहे. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील समाज माध्यमावर आकडेवारी सकट स्पष्टीकरण दिले असून ज्या ठिकाणी काँग्रेसचे किंवा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार जिंकले तिथे देखील

मतदारांमध्ये सात टक्क्यांच्या वर वाढ झाली असल्याचे त्यात म्हटले आहे. यावरून काँग्रेसमध्ये अंतर्गत संवाद होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे असं फडणवीस म्हणाले. दरम्यान महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी करून भाजपा युती सत्तेत आल्याचे पुरावे दररोज समोर येत आहेत आणि निवडणूक अयोग्य उत्तर देण्यास तयार नसल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे -

***थेट मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात झालेला गोंधळ त्यांनी हा उघ केलेला आहे. हा वरच्यांना जरी गोंधळ वाटत असला तरीही अनियमितता हि मतांची चोरी आहे आणि हे सरकार हे मतांची चोरी करून स्थापन झालेलं सरकार आहे मात्र निवणूक आयोगाबद्दल कुठलेही उत्तर देण्याकरता तयार नाही त्यामुळे निवणूक आयोगामध्ये कुठेही हस्तक्षेप करण्याकरता तयार नाही.***

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवडणूक हेराफेरीचा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुलगांधी यांच्या आरोपाचे निवडणूक आयोगाने नुकतेच समाज माध्यमांवरील संदेशाच्या माध्यमातून खंडन केले आहे.

महानिर्मिती

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतक-यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीजपुरवठा देवून शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मिती तर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत.या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट (PMU) सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे.

हवामान- नागपूर पाऊस

नागपूरसह विदर्भाच्या जवज जवळ सर्वच जिल्ह्यात ३० जून पर्यंत दररोज वादळी पर्जन्यमानासह पावसाचं इशारा देण्यात आला आहे. आज नागपुरात दिवसातून अनेक वेळा पावसानं हजेरी लावली. येत्या काही तासात अमरावती,

अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली, नागपूर, भंडारा इथं विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, येणाऱ्या पावसाळ्यात सुरळीत आणि  सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्यासाठी, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने मान्सून सुरक्षा योजना 2025 अंतर्गत नियोजित सर्व सुरक्षा कामे 100% पूर्ण केली आहेत.

क्रिकेट

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं इंग्लंड समोर विजयासाठी ३७१ धावांचं आव्हान ठेवलं आहे. दुसऱ्या डावात भारताने ३६४ धावा केल्या असून उपकर्णधार ऋषभ पंतने ११८ धावा फटकावल्या. दोन्ही डावात शतक झळकवणारा तो पहिला भारतीय यष्टिरक्षक फलंदाज ठरला आहे. सामन्याचा आज अखेरचा दिवस असून इंग्लंडन 30 षटकात बिनबाद 117 धावा केल्या आहे. इंग्लंडला जिंकण्यासाठी 254 धावांची आवशक्यता आहे.

******